ePaper
किरणोत्सवाने उजळले अंबाबाईचे मुखकमल; मूर्तीवर सोनसळी अभिषेक!



|| वर्ष - 8 | अंक - 201 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 31 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत
- पुणेकरांनो, खडकवासल्यातील पाणी पिण्यास अयोग्य
- चिखली-कुदळवाडीतील अतिक्रमण कारवाईला व्यापाऱ्यांचा विरोध

## राज्यातील ऊसक्षेत्राला फटका

# बदलत्या हवामानामुळे उत्पादन घटले!

### गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी जवळपास 83 लाख टन उसाचे गाळप कमी

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी

**राज्यामध्ये गाळप हंगाम मध्यावर आला आहे. गतवर्षीच्या गाळपाच्या तुलनेत यावर्षी जवळपास ८३ लाख टन उसाचे गाळप कमी झाले आहे. तर आत्तापर्यंतच्या हंगामात गतवर्षीच्या तुलनेत जवळपास १०८ लाख क्विंटल साखरेचे कमी उत्पादन झाले आहे. बदलत्या हवामानाचा फटका ऊसक्षेत्राला बसला असून, यावर्षीच्या गाळप हंगामावर त्याचा परिणाम झाला आहे.**



राज्यात आत्तापर्यंत ९८ सहकारी आणि ९८ खासगी अशा १९६ कारखान्यांच्या माध्यमातून गाळप हंगाम सुरू आहे, गतवर्षी ही संख्या २०६ होती. म्हणजेच यावर्षी दहा कारखाने सुरूच झालेले नाहीत. त्यामध्ये चार सहकारी आणि सहा खासगी कारखान्यांचा समावेश आहे.

आत्तापर्यंत ५७३ लाख ९४ हजार टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून, त्यातून ५१५ लाख ५७ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. तर गतवर्षी यादरम्यान ६५६ लाख ९४ मेट्रीक टन गाळप पूर्ण होऊन ६२३ लाख ६८ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले होते.

याबाबत वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे कार्यकारी संचालक अजित चौगुले म्हणाले, 'सुरुवातीच्या काळात पाऊस नव्हता. नंतर मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन ऊसवाढीच्या काळात फटका बसला. परिणामी, उसाची वाढ खुंटली, जमिनीत ओलावा जास्त राहिल्याने उत्पादनात घट आली आहे. पुढील वर्षी मात्र अशी परिस्थिती नसेल. मुख्यत्वे हवामान बदलाचा यावर्षी फटका बसला आहे.'

#### साखर उताऱ्यात कोल्हापूर विभाग अव्वल

गतवर्षीच्या तुलनेत गाळप आणि उत्पादनही घटले आहेच, त्याबरोबरच उसाची गुणवत्ताही खालावत चालली असल्याची शंका तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे सरासरी साखर उतारा ९.४९ टक्क्यांहून ८.९८ टक्क्यांपर्यंत साखरेचा उतारा खाली आला आहे. राज्यात सर्वाधिक १०.६३ टक्के उतारा कोल्हापूर विभागाचा आहे, तर नागपूर विभागात सर्वांत कमी हा ४.८४ टक्केच उतारा आहे.

## विद्यार्थीनीचा विनयभंगप्रकरणी कार्यवाही करा

### पुणे शहर व ग्रामीण परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तींमध्ये लक्षणीय वाढ

| पुणे | महाईन्यूज

**शहर परिसरात महिला आणि लहान मुलींवर विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच, एकंदरितच पुणे शहर व ग्रामीण परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तींमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. अशीच आणखी एक संतापजनक घटना कोंढवा परिसरात घडली आहे. येथे एका शाळकरी मुलीवर दि. ११ डिसेंबर, २०२४ रोजी विनयभंगाची घटना घडल्याचे समाजमाध्यमांद्वारे निदर्शनास आले आहे.**

यांप्रकरणात कोंढवा पोलीस स्टोशनमध्ये गुन्हा क्र. १३८८/२०२४ नोंदविण्यात आला असून आरोपीस दि. २४ डिसेंबर, २०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आरोपीला कठोर शिक्षा व्हावी असे निर्देश शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुणे पोलीस आयुक्त यांना दिले आहेत. सदरची घटना पुण्यासारख्या पुरोगामी आणि



महिला सक्षमिकरणास प्राधान्य देणाऱ्या शहराला निश्चितच शोभणारी नाही. अशा परिस्थितीत पुणे शहरात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारावी आणि मुली व महिलांना सुरक्षिततेचे वातावरण मिळावे असं म्हणत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काही महत्त्वाच्या सूचनाही दिल्या आहेत.आरोपी बस चालकावर पॉक्सो कायद्यांतर्गत तत्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व त्यास जामीन मिळणार नाही याची दक्षता घेण्यात घ्यावी. या घटनेतील सर्व परिस्थितीजन्य पुरावे व न्यायवैद्यकीय दस्तऐवज एकत्रित करून न्यायालयापुढे सादर करण्यात यावे. हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्यात यावे व यासाठी शासनातर्फे विशेष सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती प्राधान्याने करण्यात यावी. जेणेकरून, आरोपीस कठोर शिक्षा होणे सुलभ जाईल. पीडित मुलीच्या पालकांचे समुपदेशन करण्यात यावे व त्यांना मनोधैर्य योजनेतून यथाशक्य मदत देण्यात यावी.

# ‘खडकवासल्या’तील पाणी पिण्यास अयोग्य!

## राज्य आरोग्य प्रयोगशाळेच्या तपासणीतील निष्कर्ष

। पुणे । महाईन्यूज। प्रतिनिधी।

**शहरात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या वाढल्याने आरोग्य विभागाने पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासण्यास सुरुवात केली आहे. राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून सिंहगड रस्ता परिसरातील जलस्रोतांसह खडकवासला धरणातील पाण्याची तपासणी करण्यात आली.**



### पाणी पिण्यास का अयोग्य?

* पाण्यात ई-कोलाय, कोलीफॉर्म जीवाणू
* उष्ण रक्ताच्या प्राण्यांच्या विष्ठेत दोन्ही जीवाणूंचे अस्तित्व
* पाण्यात मानवासह प्राण्यांची विष्ठा मिसळल्याचे निष्पन्न
* पाणी पिल्यास जीवाणू संसर्गाचा धोका
* प्रक्रिया न करता पाणी पिल्यास आरोग्य समस्या

त्यात ई-कोलाय आणि कॉलिफॉर्म हे जीवाणू आढळल्याने हे पाणी प्रक्रिया न करता पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष निघाला आहे.शहर परिसरात जीबीएस रुग्णसंख्येत वाढ झाल्यानंतर दूषित पाण्यामुळे ही बाधा झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली. सिंहगड रस्ता परिसरात या आजाराचे ८० टक्के रुग्ण आढळून आले आहेत.

शहराच्या विविध भागांतील १४४ नमुने राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे रासायनिक व जैविक तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यातील ८ पाणी नमुने पिण्यास अयोग्य आढळले आहेत. यात सिंहगड रस्ता परिसर, खडकवासला धरण जलाशय आणि पिंपरी-चिंचवडमधील पाणी नमुन्यांचा समावेश आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.खडकवासला धरणातील एक नमुना, सिंहगड रस्ता परिसरातील ४ नमुने आणि पिंपरी-चिंचवडमधील ३ नमुन्यांमध्ये ई-कोलाय आणि कॉलीफॉर्म हे जीवाणू आढळले. हे दोन्ही जीवाणू उष्ण रक्ताच्या प्राण्यांच्या विष्ठेमध्ये आढळतात. त्यामुळे मानवासह इतर प्राणीविष्ठेमुळे जलस्त्रोत दूषित झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या पाण्यामध्ये जीवाणू आढळल्याने ते पाणी मानवास पिण्यास अयोग्य आहे. हे पाणी पिल्यास आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रक्रिया करूनच हे पाणी नागरिकांना पिण्यास द्यायला हवे, असेही सूत्रांनी सांगितले.राज्य आरोग्य प्रयोगशाळेत कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी या ‘जीबीएस’ला कारणीभूत ठरणाऱ्या जीवाणूची तपासणी होत नाही. केवळ ई-कोलाय आणि कॉलीफॉर्म यांची चाचणी प्रयोगशाळेत होते. त्यामुळे या पाण्यात कॅम्पायलोबॅक्टरसह इतरही जीवाणू असण्याची शक्यता आहे. मात्र, खडकवासला धरणातील पाण्यात कोणतेही रासायनिक घटक आढळलेले नाहीत, असे सूत्रांनी स्पष्ट केले..

शहर परिसरात जीबीएस रुग्णसंख्येत वाढ झाल्यानंतर दूषित पाण्यामुळे ही बाधा झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली. सिंहगड रस्ता परिसरात या आजाराचे ८० टक्के रुग्ण आढळून आले आहेत. शहराच्या विविध भागांतील १४४ नमुने राज्य आरोग्य प्रयोगशाळेकडे रासायनिक व जैविक तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.

# फरार आरोपी कृष्णा आंधळे आहे कुठे आहे?

## सुप्रिया सुळे घेणार केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील गेल्या ५१ दिवसांपासून फरार असलेला आरोपी कृष्णा आंधळे आहे कुठे आहे? या आरोपीला पकडण्यात अद्यापही राज्य सरकारला यश का आले नाही? असा प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी सरकारच्या कारभारावर टीका केली. जोपर्यंत बीडमधील संतोष देशमुख आणि परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही कोणीही स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही सुळे यांनी दिला.**



सिंहगड रस्त्यावरील किरकिटवाडी, खडकवासला आणि इतर भागात जीबीएस रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुळे यांनी नांदेड फाटा येथील ज्या विहिरीतून पाणी पुरवठा केला जातो. तेथे भेट देत नागरिकांशी संवाद साधला त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी त्या बोलत होत्या.

मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या खून प्रकरणावरून खासदार सुळे यांनी राज्य सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढले.बीड मधील स्थानिक आमदार संदीप क्षीरसागर, सुरेश धस, नमिता मुंदडा, प्रकाश सोळंकी यांनी देशमुख खून प्रकरणात गेल्या ५० दिवसांमध्ये अनेक आरोप केले आहेत. यामध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी नोंद घेऊन महाराष्ट्राला न्याय द्यावा, अशी अपेक्षा खासदार सुळे यांनी व्यक्त केली. देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा ५१ दिवसांपासून बेपत्ता आहे. तो नेमका कुठे आहे? तो असा गायब कसा होऊ शकतो? पोलिसांना त्याचा शोध का लागत आहे. पोलिसांची यंत्रणा काय करत आहे? असा सवालही सुळे यांनी विचारला आहे.

बीड प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले आहेत. उपमुख्यमंत्री म्हणाले की, ही कागदपत्रे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देणार आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यावर काय निर्णय घेतात याकडे आपलेही लक्ष असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बीडमध्ये पीकविमा आणि बारामती लोकसभा मतदारसंघात हार्वेस्टर आणि पिक विमा घोटाळा हे दोन मोठे घोटाळे झाले आहेत. राज्याचे विद्यमान कृषी मंत्र्यांनीच घोटाळे झाली असल्याची कबुली आहे. पीकविमा आणि हार्वेस्टर घोटाळा कुठे झाला आहे, याची सर्व माहिती राज्य सरकारकडे आहे. राज्य सरकारने ती त्यांनी समोर आणावी, अशी मागणीही सुळे यांनी केली. राज्यात हप्तेबाजी, भ्रष्टाचार हे सर्व सुरू आहे, ते थांबले पाहिजे. यासाठी माणुसकीच्या नात्याने आम्ही लढणार आहे. संसदेचे जरी अर्थसंकल्पीय अधिवेशन असले तरी महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेचे मुद्दे महाविकास आघाडीचे सर्व खासदार मोठ्या ताकदीने मांडणार आहोत. या विषयावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे खासदार सुळे यांनी सांगितले.

### सरकारच्या कारभारावर ताशेरे...

सिंहगड रस्त्यावरील किरकिटवाडी, खडकवासला आणि इतर भागात जीबीएस रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुळे यांनी नांदेड फाटा येथील ज्या विहिरीतून पाणी पुरवठा केला जातो. तेथे भेट देत नागरिकांशी संवाद साधला त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी त्या बोलत होत्या. मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या खून प्रकरणावरून खासदार सुळे यांनी राज्य सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढले.बीड मधील स्थानिक आमदार संदीप क्षीरसागर, सुरेश धस, नमिता मुंदडा, प्रकाश सोळंकी यांनी देशमुख खून प्रकरणात गेल्या ५० दिवसांमध्ये अनेक आरोप केले आहेत. यामध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी नोंद घेऊन महाराष्ट्राला न्याय द्यावा, अशी अपेक्षा खासदार सुळे यांनी व्यक्त केली. देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा ५१ दिवसांपासून बेपत्ता आहे. तो नेमका कुठे आहे? तो असा गायब कसा होऊ शकतो? पोलिसांना त्याचा शोध का लागत आहे.

## तीन तास ठिय्या; व्यापारी रस्त्यावर!

# कुदळवाडीत बुलडोझर पॅटर्नला विरोध!

### वाहतूक कोंडी अन् तणावाचे वातावरण : प्रशासन कारवाईवर ठाम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत भंगार दुकानांवर गुरुवारी (दि.३०) कारवाईला सुरवात केली. मात्र, या कारवाईला स्थानिक व्यापाऱ्यांनी विरोध करत देहू-आळंदी रस्ता अडवल्याने रस्त्यांवर दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या. सुमारे तीन तास नागरिकांनी रस्त्यावर ठाण मांडले. या भागात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पिंपरी पालिका , पोलीस प्रशासन,राज्य राखीव बलाचे पोलीस, पालिकेचे सुरक्षारक्षक या ठिकाणी तैनात होते.**



पिंपरी चिंचवड येथील चिखली, कुदळवाडीतील भंगार दुकाने, गोदामे, कंपन्या, हॉटेल, वर्कशॉप्स, बेकरी अशी अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड उभारलेल्या 4 हजार 300 दुकाने, पत्रा शेड, टपऱ्या यांना महापालिकेने नोटिसा बजावल्या आहेत. आजपासून महापालिकेने कारवाईला सुरुवात केली होती सकाळपासूनच याबाबतची तयारी सुरू होती महापालिकेचे अतिक्रमण पथक या भागात दाखल झाल्याची कोण कोण नागरिकांना लागतात नागरिकांनी रस्त्यावर उतरत आंदोलन छेडले आहे. त्यामुळं मोठी वाहतुक कोंडी निर्माण झाली. बंदोबस्तासाठी पोलिस परिसरात दाखल झाले.

महापालिकेने पाठवलेल्या नोटीसनंतर पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह पवारवस्ती, चिखली येथे बैठक पार पडली. या बैठकी दरम्यान उद्योजकांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. मोठी गोदामे, वारंवार उद्भवणाऱ्या आगीच्या घटना यामुळे चिखली, कुदळवाडी परिसर संवेदनशील झाला आहे.

या भागातील अनधिकृत बांधकामे दुकाने कळीचा मुद्दा ठरत आहे.चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरात सुमारे पाच ते सात हजार लघुउद्योजक आहेत.

या ठिकाणी हजारो कामगार काम करतात. मात्र निमुळते रस्ते, अरुंद झालेल्या वाटा, दाटीवाटीने उभारण्यात आलेले अनधिकृत पत्र शेड आणि वारंवार भंगार व्यवसायिकांच्या दुकानांना लागणाऱ्या आगीच्या घटना यामुळे येथील अनधिकृत पत्राशेड रडारवर आले. नागरिकांकडून या घटना संदर्भात तक्रारींचा पाढा वाचला जाऊ लागला. आगीच्या घटनांमुळे प्रदूषणाचे प्रमाण देखील वाढत आहे हाच मुद्दा घेत पिंपरी पालिकेने या ठिकाणी कारवाईला सुरुवात केली.

### कारवाई थांबणार नाही : महापालिका प्रशासन

पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण विभाग उपायुक्त मनोज लोणकर म्हणाले की, कुदळवाडी – चिखली परिसरामध्ये अनधिकृतपणे पत्राशेड उभारून व्यवसाय करत असणाऱ्या व्यापाऱ्यांना महापालिकेच्या वतीने नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. कुदळवाडी चिखली परिसरामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये आगीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. कायदेशीरित्या या व्यापाऱ्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात नोटीसा दिलेल्या आहेत. पंधरा दिवसांची त्यांना मुदतही देण्यात आलेली होती. या मुदतीत त्यांनी अनधिकृत बांधकाम काढावे अशी सूचना करण्यात आलेली आहे. महापालिकेने या भागातील 4 हजार 300 व्यापाऱ्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात नोटीसा देऊन पंधरा दिवसात अनधिकृत बांधकाम हटवण्यात संदर्भात कळविण्यात आले होते. मात्र ही बांधकामे हटवण्यात आलेली नाही. नागरिकांचा उद्रेक लक्षात घेऊन तूर्तास कारवाई स्थगित ठेवण्यात आली . व्यापारी आणि पालिका प्रशासन यांची संयुक्त बैठक होऊन या संदर्भात पुढील निर्णय घेतला जाईल.

---

## माघी रथयात्रेचे चिंचवड येथून मोरगावकडे प्रस्थान

### श्रीमोरया गोसावी महाराज प्राप्त श्रीमंगलमूर्तींच्या माघी रथयात्रेस भव्य प्रारंभ

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी

**चिंचवड येथील श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज प्राप्त श्रीमंगलमूर्तींची पारंपरिक माघी रथयात्रा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात प्रारंभ झाली. श्री मोरया गोसावी महाराजांनी सुमारे ५२६ वर्षांपूर्वी सुरू केलेली ही यात्रा अखंडपणे सुरू असून, यंदाही मोठ्या भक्तसमुदायाच्या उपस्थितीत तिचे आयोजन करण्यात आले आहे. पालखी ८ फेब्रुवारीला चिंचवड येथे परतणार आहे.**



चिंचवड येथील गाणपत्य संप्रदायातील महान संत श्रीमन् महासाधू श्रीमोरया गोसावी महाराज यांना सन १४८९ मध्ये मोरगावच्या पवित्र श्री गणेश कुंडातून प्राप्त झालेले श्री मंगलमूर्ती माघ महिन्यात मोरगाव येथे नेण्याची परंपरा सुरू केली. ही परंपरा गेल्या ५२६ वर्षांहून अधिक काळ अविरतपणे सुरू आहे.यावर्षीही, चिंचवड येथील श्री मंगलमुर्ती वाडा येथून माघी रथयात्रेस भव्य सुरुवात झाली. यावेळी देवस्थानचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त श्री जितेंद्र देव व श्री केशव विद्वांस तसेच उपस्थित होते. या सोहळ्यात हजारो भक्तांनी सहभागी होत श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त श्री मंगलमूर्तींचे दर्शन घेतले. चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या वतीने सर्व भक्तगणांना या पवित्र सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या भक्तिमय आणि ऐतिहासिक पालखी सोहळ्यात सहभागी होऊन श्री मोरया गोसावी महाराज प्राप्त मंगलमूर्तींचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी लाभावी, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांनी केले आहे.

### रथयात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे ...

बुधवार, ता. २९: चिंचवड – पुणे – एकनाथ मंगल कार्यालय (पहिला मुक्काम) - गुरुवार, ता. ३०: पुणे – सासवड – श्री कऱ्हाबाई मंदिर (दुसरा मुक्काम) - शुक्रवार, ता. ३१: सासवड – जेजुरी – मोरगाव (पालखी आगमन रात्री ९ वा.) - शनिवार, ता. १ व रविवार, ता. २: श्री गणेश जयंतीनिमित्त पालखी मुक्काम - सोमवार, ता. ३: मोरगाव – जेजुरी (मुक्काम जेजुरी) - मंगळवार, ता. ४: जेजुरी – सासवड – कऱ्हाबाई मंदिर (मुक्काम) - बुधवार, ता. ५: सासवड – थेऊर (श्री चिंतामणी मंदिर) - गुरुवार, ता. ६: थेऊर – सिद्धटेक (श्री सिद्धिविनायक मंदिर) - शुक्रवार, ता. ७: सिद्धटेक – पुणे (एकनाथ मंगल कार्यालय मुक्काम) - शनिवार, ता. ८: पुणे – चिंचवड (महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी मंदिर, चिंचवड)

# बीडचा निगरगट्ट आका, चक्क सोकावलेला बोका!



**आपल्याला एक गोष्ट आठवते का ? एक माकडीण आपल्या पिल्लाला शेवटपर्यंत वाचवण्याचा प्रयत्न करते. पण, ज्यावेळी तिच्या नाका - तोंडात पाणी जाते, त्यावेळी ती त्या पिल्लाला पायाखाली घेऊन आपला जीव वाचवते.. असाच काहीसा प्रकार बीडमध्ये घडत आहे. बीड मधील कुख्यात वाल्मीक कराड याचा प्रश्न दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत चालला आहे.**

कराडला वाचवण्याचा प्रयत्न मंत्री धनंजय मुंडे यांचा सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुंडे यांचे अगदी खास दोस्त मानले जातात. पण, आता मुंडे यांचे नवनवीन प्रताप पुढे येत असल्यामुळे धनंजय मुंडे गाळात रुतत चालले आहेत. प्रश्न एवढाच आहे, की वाल्मीक कराडला किती दिवस ते 'अभय' देणार ?सध्याची परिस्थिती ही फडणवीस आणि अजितदादा यांना अडचणीत आणणारी ठरणार आहे आणि धनंजय मुंडे यांच्या म्हणण्याप्रमाणे या दोघांनी राजीनामा मागितला तर ते देण्यास तयार आहेत. आक्रमक विरोधक पाहता, मुंडे यांना आता राजीनामा देण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. वाल्मीक कराड म्हणजेच आका तुरुंगात आहे, त्याच्या पाठीशी मोठी ताकद असल्याने तो सोकावला आहे. पण, मुंडे यांची सारवासारव पाहता, ते राजीनामा देऊन वाल्मीकला उघडे पाडतील, अशी परिस्थिती आहे.

### राजीनामा द्या, प्रश्न सुटेल !

राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा म्हणून अत्यंत ताकदीने मागणी होत आहे. खरे तर धनंजय मुंडे यांच्यामध्ये थोडी जरी नैतिकता शिल्लक राहिली असती तर त्यांनी स्वतःहून तातडीने राजीनामा देऊन प्रकरणाचा तपास करावा आणि दोषी व्यक्तीस फाशी द्यावी, असे विधान करणे संयुक्तिक होते. मात्र, या वाक्याचा पूर्वार्ध गाळून केवळ दोषी व्यक्तीस फाशी द्या, हे म्हणणे म्हणजे वारंवार आपणच तयार केलेल्या शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रकार होय. खरे तर मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ज्या प्रकारे झाली, तो प्रकार पाहता आणि त्यातील धनंजय मुंडे यांचे साथीदार लक्षात येताच धनंजय मुंडे यांनी स्वतःच मंत्रीपद त्याग करायला पाहिजे होते. त्यांना मंत्रिपद देऊ नका, इथपासून राज्यभरात आवाज उठवण्यास सुरुवात झाली होती. मात्र, न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत धनंजय मुंडे मंत्रीपदावर राहिले तर काय बिघडते, असाच एकूण त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचा सूर आहे. हाच सूर धनंजय मुंडे सुद्धा आळवत आहेत. एकूणच भारतातील न्यायव्यवस्था आणि त्या व्यवस्थेतील पळवाटा शोधून प्रकरण आपल्या अंगाशी येणार नाही, याची काटेकोर तयारी करणारी मंडळी शासन म्हणून काम करतात. कायदे तेच तयार करतात आणि अंमलबजावणी आपण सांगू तशी व्हायला पाहिजे, असा प्रशासनासाठी त्यांचा आग्रह असतो.


### तारीख पे तारीख, दुसरं काय?

साहाजिकच न्यायालयात खटला उभा राहून, तो संपून त्याचा निकाल लागल्यावर धनंजय मुंडे राजीनामा देणार असतील, तर या पाच वर्षात ते घडेल असे दिसत नाही. याचे अत्यंत थेट उदाहरण मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालाबाबत न्यायालयाने पुढील तारीख दिली आणि हे प्रकरण गणेशोत्सवापर्यंत निवडणुका होणार नाहीत यावर शिक्कामूहूर्त करते झाले. गेले तीन, साडेतीन वर्षाहून अधिक काळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नाहीत. महापालिका ते पंचायत समिती यावर लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. मात्र न्याय संस्थे समोर आपली बाजू मांडणारी मंडळी ज्या प्रकारे वेळ काढूपणाचे धोरण अवलंबच आहेत किंवा न्यायालय या सगळ्याचा विचार करत आहे आणि पुढील तारखा देत आहे हे पाहता दिवंगत संतोष देशमुख यांना या पंचवार्षिकमध्ये न्याय मिळेल का असा प्रश्न आहे. त्यानंतर धनंजय मुंडे त्यात दोषी ठरल्यावर मग राजीनामा देणार असतील, तर आगामी पाच वर्षे धनंजय मुंडे यांना मंत्रीपदावरून बाहेर पडण्याचा व त्यांचा राजीनामा घेण्याचा प्रश्नच येत नाही.

### गेंड्याची कातडी अंगावर पांघरली

थोडक्यात, न्यायव्यवस्था तातडीने निकाल देऊ शकणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आपण कमी पडणार नाही याची खात्री नव्हे जबर आत्मविश्वास धनंजय मुंडे आणि साहजिकच अजित पवार यांना असल्यामुळे जोपर्यंत न्यायालय धनंजय मुंडे यांना दोषी ठरवत नाही तोपर्यंत त्यांना त्यांच्या पदावरून कोणी हटवू शकत नाही, हे नक्की आहे. हा सगळा प्रकार निगरगट्टपणाचे लक्षण आहे. नैतिकता ही अत्यंत नाजूक, महत्त्वाची, संवेदनशील बाब आहे. गेंड्याची कातडी पांघरलेल्या धनंजय मुंडे यांच्यासारख्या नेत्यांना याचा स्पर्श होऊन काहीही उपयोग नाही. त्यांच्या कातडीला याचा स्पर्श होणारच नसेल तर नैतिकतेपोटी त्यांच्या राजीनाम्याची मागणी करणे, हा शुद्ध वेडेपणा आहे. आम्ही कितीही बायका करू, आम्ही कुठेही, कसेही राहू, कायदा तोडून मोडून वापरू, गुन्हे केले तरी ते सिद्ध होत नाही तोपर्यंत आम्ही निर्दोष म्हणूनच उजळ माथ्याने वावरू, यासारख्या टोकाच्या निबर निर्ढावलेल्या मनोवृत्तीला सर्वसामान्य जनता काही करू शकत नाही. लालबहादूर शास्त्री यांची नैतिकता यांच्यापासून करोडो मैल दूर आहे. जनतेच्या भावना आणि धनंजय मुंडे यांचे कृत्य याची चाड कुणालाच नाही. धनंजय मुंडे यांनी चौकशी मध्ये लुडबूड न करता, फक्त पाठिंबा द्यावा, एवढीच आता माफक इच्छा बाकी राहिली आहे !

## जेथे नाम तेथे परमात्मा आहेच।




तुम्ही सर्व भाविकजन । ऐकावे माझे वचन ॥
माझे भेटी सदा राहावे । मुखाने रामनाम घ्यावे ॥
जो नामात राहिला । तो अखंड माझ्या दर्शनात बसला ॥
जेथे नामाचे स्मरण । ते माझे वसतिस्थान ॥

जेथे रामाचे नाव । तेथे माझा ठाव । हे आणून चित्ती ।
सुखे राहावे प्रपंचाप्रति ॥ नामात ठेवा मन । हेच माझे खरे दर्शन ॥ नेहमी रामाचा ध्यास । हाच माझा सहवास ॥
तुम्ही सुज्ञ माझे प्राण । नाम करा तेवढे जतन॥

नामात ठेवावे प्रेम । तेथे माझी वसति जाण ॥
ज्याने ज्याने इच्छा धरावी व्हावे माझे । त्याने नाम कधी न सोडावे वाचे ॥ एवढे देईल जो नामदान । त्याला अर्पण करून घेईन जाण ॥ जेथे नाम । तेथे माझे धाम ॥

नामापरते न मानी सुख । तेथेच माझे राहणे देख ।
तुम्ही शक्य तितके राहावे नामात । हेच माझे सांगणे तुम्हांस ॥ शक्य तो नामस्मरण करावे । म्हणजे मी तुमचेजवळ अखंड आहे असे समजावे ॥
जेथे परमात्म्याचे नाव । तेथे माझा आहे ठाव ॥

जेथे नाम तेथेच मी ।
हा भरवसा बाळगून असावे तुम्ही ॥ नाही केले वेदपठण । शास्त्राचे नाही झाले ज्ञान । श्रुतिस्मृति उपनिषदे यांची नाही ओळखण। असा मी अज्ञान जाण ॥

तरी एक भजावे रघुनाथासी । अर्पण होऊन जावे त्यासी ।
ऐसे जाणून चित्ती । खंड नाही समाधानवृत्ति ॥
मी सतत आहे तुमच्यापाशी हा ठेवा निर्धार ।
न सोडावा आता धीर ॥ ठेवावा एक विश्वास।
मी आहे तुम्हाजवळ खास ॥

श्रीदासबोध नामस्मरण। याचे असावे वाचन ।
मी त्यातच मानावे जाण । कृपा करील रघुनंदन ॥
मी तेथे आहे हे नक्की समजावे ।
राम सर्व ठिकाणी आहे हे लक्षात ठेवावे ॥
उपाधिरहित मी तुमचेजवळ सतत आहे॥

मी नाही अशी कल्पना करू नये ।
तुमचे जवळ आहे हे खात्रीने समजावे ॥
मी नाही सोडून गेलो कोणाला दूर ।
माझी वसति तुमच्या शेजारी जाण ॥
माझे येणे जाणे तुमचे हाती । तुम्हा सर्वांहून नाही परती ॥
रामपरता मी । जैसा प्राणापरता देह जाण ॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मित्र म्हणून तुम्हाला सल्ला देतो!

## ठाकरेंनी निकालावर संशय घेताच भाजपाचा पलटवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून दोन महिन्याचा काळ लोटला तरी राज्यात अभूतपूर्व अशी शांतता पसरली आहे. असा निकाल कसा काय लागला? याबद्दल सर्वांनाच आश्चर्य वाटत आहे. फक्त पराभव झालेलेच नाही, तर ज्यांचा विजय झाला, तेही धक्क्यात आहेत, अशी भूमिका मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आज पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात व्यक्त केल्यानंतर आता त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. राज ठाकरे यांचा इशारा भाजपाच्या विजयाकडे होता. भाजपाने मागच्या दोन निवडणुकांत जिंकलेल्या जागांची आकडेवारीही यावेळी राज ठाकरेंनी उद्धृत केली. यानंतर आता भाजपाकडूनही जोरदार पलटवार करण्यात आला आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी राज ठाकरेंवर टीका केली आहे.**



आशिष शेलार म्हणाले, "श्रीमान राज ठाकरे यांनी त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या राज्यस्तरीय मेळाव्यात एक नरेटीव्ह स्थापन करण्याचा प्रयत्न केला. तो अर्धवट माहितीच्या आधारावर आहे. भाजपाने कधीच तडजोडीचे राजकारण केले नाही. प्रथम राष्ट्र आणि राष्ट्रवादी विचाराच्या आधारावर राष्ट्रनिर्माण यावरील राजकारणात आम्ही कधीच तडजोड केली नाही. यातून तुम्हाला शिकण्यासारखे काही असेल तर नक्कीच शिका. हा मित्र म्हणून तुम्हाला सल्ला देतो." "राज ठाकरे यांनी जर तडजोडीचे आरोप केले असतील तर मी त्यांना सांगू इच्छितो की, अयोध्येत राम मंदिराच्या निर्माणात आम्ही कधीच तडजोड केली नाही. काश्मीर मधून कलम ३७० हटवण्याच्या विषयावर आम्ही कधीच तडजोड केली नाही. एक भारत श्रेष्ठ भारत या संकल्पनेत कधीच तडजोड केली नाही आणि होणार नाही. वेळ, काळ आणि राजकीय परिस्थिती पाहून सरकारे चालवताना जे तात्कालिक घडते, ज्याचा श्रीमान राज ठाकरे जो अर्थ लावून त्याचे सवंग "निरुपण" ते करू पाहत आहेत", अशी टीका आशिष शेलार यांनी केली. भाजपाशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षानेही राज ठाकरेंवर टिकास्र सोडले आहे. अजित पवारांचे ४१ आमदार कसे काय निवडून आले? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला होता. त्यावर आता अमोल मिटकरी यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, "राज ठाकरे यांना नेहमीच उशीरा उठून चिंतन करण्याची सवय असल्यामुळे विधानसभेत स्वतःच्या घरातच दारूण पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर आमच्या ४२ जागा कशा आल्या? हा शॉक त्यांना दीड महिन्यांनी बसला आहे. मात्र आपल्या सुपुत्राचा दारूण पराभव कसा झाला आणि पक्षाची एकही जागा का निवडून आली नाही. यावर त्यांनी भाष्य करावे. यासाठी त्यांनी पहाटे ५ वाजल्यापासून कामाला लागले पाहीजे." मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे त्यांच्या रोखठोक स्वभावासाठी आणि आक्रमक शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. दरम्यान राज ठाकरे यांनी मुंबईतल्या वरळी या ठिकाणी मनसेचा मेळावा घेतला. या मेळाव्यात त्यांनी महाराष्ट्राच्या निवडणूक निकालाबाबत भाष्य केलं. शिवाय भाजपाचे नेते भेटायला येतात त्यावर त्यांना काय नका येऊ असं सांगणार का? असा सवालही त्यांनी केला. चंद्रकांत पाटील यांचा एक किस्सा सांगत राज ठाकरेंनी त्यांच्या खुमासदार शैलीत भाजपा नेत्यांची खिल्ली उडवली. "राजकारणाचा सगळा चिखल झाला आहे, त्यात तुम्ही जागरुक राहिलं पाहिजे. भाजपाच्या नेत्यांना भेटायला नको. भेटायला नको? समोरचा माणूस म्हणाला चहा प्यायला घरी येतो तर त्याला काय सांगायचं? घरीच चहा पी. तुम्हाला कुणी विचारलं तर तुम्ही काय सांगाल? मला जेव्हा कुणीही भेटायला येतं तेव्हा मी तुम्हाला विकत नाही. मी मराठीचा बाणाही बोथट करत नाही.

### छावा' चित्रपटावर रोखठोक भूमिका

नमस्कार वगैरे करुन म्हणाले मुंबईत आलो की येतो चहा प्यायला. मला सांगा ही परिस्थिती तुमच्यावर आली.चहा कशाला प्यायचा? कशाला घरी येता? असं सांगू का? एक माणूस समोरुन सांगतोय की येतो तर येच म्हणणार." असं राज ठाकरे म्हणाले.छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित 'छावा' या आगामी बॉलीवूड चित्रपटाच्या ट्रेलरमधील एका दृश्यामुळे महाराष्ट्रात वाद निर्माण झाला आहे. या चित्रपटात संभाजी महाराजांची भूमिका अभिनेता विकी कौशल याने साकारली आहे. तर संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाईंची भूमिका अभिनेत्री रश्मिका मंदानाने साकारली आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमधील एका दृश्यात दोघेही लेझिम हे लोकनृत्य सादर करताना दिसत आहेत. गेल्या आठवड्यात ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर अनेकांनी या दृश्यावर टीका केली होती. त्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी काही राजकारण्यांशी संवाद साधला होता. तसेच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचीही भेट घेऊन त्यांना याबाबत माहिती दिली. याबाबत आता खुद्द राज ठाकरे यांनीच भूमिका स्पष्ट केली. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मेळावा होत आहे.

---

# तब्बल 65 कोटीचा बोगस पीक विमा उचलला

## गुन्हा दाखल करण्याची खासदार जाधव यांची मागणी

। कोल्हापूर । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जिल्ह्यातील गंगाखेड, पालम, सोनपेठ व जिंतूर या चार तालुक्यातील महसूल मंडळात अस्तित्वात नसलेल्या गावांचा पिकविमा काढून जवळपास ६५ कोटींचा बोगस पिकविमा उचलल्याचा प्रकार घडला आहे. या बोगस पिकविमा प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह पीक विमा उचलणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी खासदार संजय जाधव यांनी केली आहे.**



महसूल मंडळ व कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रूपयाचा बोगस पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषीवर कारवाई न केल्यास या प्रकरणी २६ हजार १४९ हेक्टरवरील पिक नुकसानीचा पिकविमा महसूल व कृषि विभागाने दाखवून कोट्यवधी रूपयाचा पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याचे यावेळी खासदार जाधव यांनी नमूद केले. बोगस पिकविमा तयार करणारा झारीतील शुक्राचार्य कोण आहे याचा शोध घेऊन हे प्रकरण सरकारने गांभीर्याने घ्यावे याकडे खासदार जाधव यांनी लक्ष वेधले आहे.परभणी जिल्ह्यात खरीप हंगामाचा पिकविमा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर भरला होता. तसेच प्रशासनाने अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या महसूल मंडळनिहाय सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, सोनपेठ, पालम या तालुक्यातील काही गावे महसूल मंडळात नसतानाही पिकविमा देण्यात आला आहे. यामध्ये गंगाखेड तालुक्यातील आनंदनगर ५२४८.९९ हे., जिंतूर तालुक्यातील अंगलगव्हाण तांडा ४९३.१६ हे., केहाळ तांडा ६२.९५ हे., लिंबाळा ५५२.११संखाराम तांडा ९१२.६८ हे., सोनपेठ १३७७.४४ हे., सोनपेठ २३०६.८१ हे., तुकाई तांडा ५४६.३३ हेक्टर असे एकूण २६ हजार १४९ हेक्टरवरील पिकविमा दाखवून जवळपास ६५ कोटी रूपयांचा बोगस विमा उचलण्यात आला आहे असे खासदार जाधव यांनी सांगितले.

### शासनाची फसवणूक केल्याचा दावा

महसूल मंडळ व कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रूपयाचा बोगस पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषीवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी खासदार जाधव यांनी केली आहे.महसूल मंडळ व कृषि विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यवधी रूपयाचा बोगस पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी दोषीवर कारवाई न केल्यास या प्रकरणी २६ हजार १४९ हेक्टरवरील पिक नुकसानीचा पिकविमा महसूल व कृषि विभागाने दाखवून कोट्यवधी रूपयाचा पिकविमा उचलून शासनाची फसवणूक केल्याचे यावेळी खासदार जाधव यांनी नमूद केले.

# तुम्ही यमुनेत डुबकी कधी घेणार?

## यमुना नदी प्रदूषण: राहुल गांधींचे केजरीवालांना खुले आव्हान

**। नवी दिल्ली ।वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मतदान जवळ येत असतानाच काँग्रेस आणि आप नेत्यांमधील आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडताना पाहायला मिळत आहे. यादरम्यान काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांनी गुरूवारी आम आदमी पक्षाचे प्रमुख् अरविंद केजरीवाल यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली. गांधी यांनी यमुना नदीच्या प्रदुषणाच्या मुद्द्यावर केजरीवाल यांच्यावर हल्ला चढवला. त्यांनी केजरीवाल यांनी तुम्ही यमुना नदीत कधी डुबकी घेणार असा प्रश्न देखील विचारला.**



लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत अरविंद केजरीवाल यांना चॅलेंज दिलं आहे. “केजरीवालजी आता २०२५ देखील आलं, तुम्ही यमुनेत कधी डुबकी घेणार? दिल्ली वाट पाहत आहे.” राहुल गांधी यांनी पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये ते स्थानिक लोकांशी यमुना नदीच्या प्रदूषणाच्या मुद्द्यावर संवाद साधताना दिसत आहेत.दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी विधानसभेसाठी मतदान होणार आहे.

यापूर्वी राहुल गांधी यांनी केजरीवाल यांनी पाच वर्षांपूर्वी यमुनेचे पाणी पिण्यायोग्य बनवण्याच्या आश्वासनाच्या मुद्द्यावर टीका केली. त्यांनी केजरीवाल यांच्या पत्रकार परिषदेवर देखील टीका केली. केजरीवाल यांनी गुरुवारी दावा केला की गेल्या काही दिवसांपासून हरियाणामधून अत्यंत धोकादायक अमोनिया पातळी असलेले पाणी यमुनेमध्ये सोडले जात आहे. केजरीवाल यांनी आरोप केला, “जेव्हा मुख्यमंत्री आतिशी यांनी हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून हे विषारी पाणी सोडणे थांबवण्याची विनंती केली, तेव्हा त्यांनी काहीही केले नाही.”

राहुल गांधी यांनी अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत जनतेला खोटी आश्वासने दिल्याचा आरोप केला. “त्यांनी खोटी आश्वासने दिली. पाच वर्षांपूर्वी केजरीवाल म्हणाले की मी यमुनेत स्नान करेन आणि नदीचे पाणी पिईल. मी त्यांना आव्हान देतो की, यमुनेचे पाणी सोडा, इथे (बदली) लोकांना मिळतं ते पाणी पिऊन दाखवा.” “ज्या व्यक्तीने मी भ्रष्टाचार संपवेन, यमुना नदीत आंघोळ करेल, यमुना नदीते पाणी पिईल, म्हटले होते, त्याच व्यक्तीने सर्वात मोठा मद्य घोटाळा केला आहे”, असेही राहुल गांधी म्हणाले.लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत अरविंद केजरीवाल यांना चॅलेंज दिलं आहे.

### पाणी सोडणे थांबवण्याची विनंती

“केजरीवालजी आता २०२५ देखील आलं, तुम्ही यमुनेत कधी डुबकी घेणार? दिल्ली वाट पाहत आहे.” राहुल गांधी यांनी पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये ते स्थानिक लोकांशी यमुना नदीच्या प्रदूषणाच्या मुद्द्यावर संवाद साधताना दिसत आहेत.दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी विधानसभेसाठी मतदान होणार आहे. यापूर्वी राहुल गांधी यांनी केजरीवाल यांनी पाच वर्षांपूर्वी यमुनेचे पाणी पिण्यायोग्य बनवण्याच्या आश्वासनाच्या मुद्द्यावर टीका केली. त्यांनी केजरीवाल यांच्या पत्रकार परिषदेवर देखील टीका केली. केजरीवाल यांनी गुरुवारी दावा केला की गेल्या काही दिवसांपासून हरियाणामधून अत्यंत धोकादायक अमोनिया पातळी असलेले पाणी यमुनेमध्ये सोडले जात आहे. केजरीवाल यांनी आरोप केला, “जेव्हा मुख्यमंत्री आतिशी यांनी हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून हे विषारी पाणी सोडणे थांबवण्याची विनंती केली, तेव्हा त्यांनी काहीही केले नाही.”राहुल गांधी यांनी अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत जनतेला खोटी आश्वासने दिल्याचा आरोप केला. “त्यांनी खोटी आश्वासने दिली.

# गोव्याच्या पोलीस अधीक्षकांना एका रात्रीत हटवलं

## सुनीता सावंत यांचा दोन दिवसांपूर्वी झाला होता राज्यपालांकडून गौरव

**। पणजी । वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दक्षिण गोव्याच्या पोलीस अधीक्षक सुनीता सावंत यांनी कार्यभार सोडाण्याबाबतचा, आदेश गोवा सरकारने काढल्यामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला आले. अचानक मध्यरात्री काढलेल्या या आदेशावरून काँग्रेसने भाजपा सरकारला लक्ष्य केले असून, जिल्ह्यातील बजरंग दलाच्या नेत्यांबद्दल माहिती मागवल्यामुळे त्यांची बदली केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.**




दरम्यान गोवा सरकारने अंमली पदार्थ विरोधी शाखेचे पोलीस अधीक्षक टिकम सिंग वर्मा यांच्याकडे दक्षिण गोव्याचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. सावंत यांना सोमवारी रात्री वायरलेस संदेशाद्वारे पद कार्यभार सोडण्यास सांगण्यात आले गेले. त्या फ्रेब्रुवारी २०२४ पासून या पदावर होत्या. अधिकाऱ्यांच्या दिलेल्या माहितीनुसार, सावंत यांच्या बदलीचा अधिकृत आदेश अद्याप जारी झालेला नाही“मला याबद्दल काहीही माहिती नाही. मी माझे कर्तव्य योग्य पद्धतीने पार पाडले आहे. मला पदभार सोडण्यास आणि मुख्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले होते, त्यामुळे मी आदेशाचे पालन केले.”गोव्यात बजरंग दलाच्या नेत्यांबद्दल माहिती गोळा करण्यास सुरुवात करताच, सरकारने घाबरून त्यांची तात्काळ बदली केली,” असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांनी केला आहे. ते पुढे म्हणाले, “यावरून स्पष्ट होते की भाजपला प्रशासनात रस नाही तर त्यांच्या वैचारिक साथीदारांना संरक्षण देण्यात आणि प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांना दडपण्यात रस आहे.” पाटकर यांनी असाही आरोप केला की,“ही घाईघाईने केलेली बदली, भाजप-आरएसएस विचारसरणी त्यांच्या फुटीरतावादी अजेंड्याचे रक्षण करण्यासाठी प्रशासनात कशी हस्तक्षेप करत आहे याचे आणखी एक उदाहरण आहे”. बजरंग दलाचे गोवा संयोजक विराज देसाई म्हणाले की, “पोलीस अधीक्षकांच्या बदलीबद्दल किंवा पोलीस त्यांच्या संघटनेच्या सदस्यांबद्दल काही माहिती मागत आहेत की नाही याबद्दल मला कोणतीही माहिती नाही.

### राजकीय हितासाठी पोलिसांचा वापर

बजरंग दलाचे नाव अनावश्यकपणे ओढले जात आहे. आम्हाला पोलिसांच्या कारभारात रस नाही.”दरम्यान सावंत यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यापूर्वी, त्यांना राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांच्या हस्ते विशेष मान्यता पुरस्कार मिळाला होता. याचबरोबर गेल्या वर्षी त्यांची विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदकासाठीही निवड झाली होती.सुनीता सावंत यांनी १९८९ मध्ये धेम्पे महाविद्यालयातून रसायनशास्त्रात पदवी घेतली आहे. त्यानंतर काही दिवस त्यांनी शिक्षिका म्हणून काम केले होते.

# सूर्या दादाच्या बहिणींचा जबरदस्त डान्स!

सध्याच्या काळात सोशल मीडियावर विविध गाणी ट्रेंड होत असतात. गेल्या काही दिवसांपासून रवीना टंडनच्या १९ वर्षीय लेकीचं म्हणजेच राशा थडानीचं 'उई अम्मा' गाणं सर्वत्र ट्रेंडिंग आहे. या गाण्यातील राशाच्या एक्स्प्रेशन्स, तिचा डान्स या सगळ्या गोष्टी चाहत्यांच्या पसंतीस उतरल्या आहेत. यामुळेच हे गाणं सर्वत्र चर्चेत आलं. नेटकऱ्यांपासून ते मोठमोठ्या सेलिब्रिटींपर्यंत अनेकजण राशा थडानीच्या गाण्यावर थिरकल्याचं गेल्या काही दिवसांत पाहायला मिळालं. आता राशाच्या 'उई अम्मा' गाण्याची भुरळ मराठी कलाकारांना सुद्धा पडली आहे. 'झी मराठी' वाहिनीवर गेल्या सहा महिन्यांपासून 'लाखात एक आमचा दादा' ही मालिका सुरू आहे. ही मालिका गेल्यावर्षी जुलैमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आली. यामध्ये प्रेक्षकांना सूर्या दादा व त्याच्या कुटुंबाची गोष्ट पाहायला मिळत आहे. या मालिकेत मुख्य अभिनेत्याची भूमिका अभिनेता नितीश चव्हाण साकारत आहे. तर, मुख्य अभिनेत्री म्हणून या मालिकेत दिशा परदेशी झळकत आहे. तसेच सूर्या दादाच्या चार बहिणींची भूमिका मालिकेत कोमल मोरे ( तेजश्री ), समृद्धी साळवी ( धनश्री ), इशा संजय ( राजश्री ), जुई तनपुरे ( भाग्यश्री ) या अभिनेत्रींनी साकारल्या आहेत. सूर्या दादाच्या चार बहिणींपैकी राजश्री आणि भाग्यश्री नुकत्याच राशा थडानीच्या 'उई अम्मा' गाण्यावर थिरकल्या आहेत. या सुपरहिट बॉलीवूड गाण्यावर या दोन ऑनस्क्रीन बहिणींनी कमाल एक्स्प्रेशन्ससह जबरदस्त डान्स केल्याचं पाहायला मिळत आहे.इशा संजयने 'उई अम्मा' गाण्यावरचा डान्सचा व्हिडीओ शेअर करत याला 'चुई मुई सी हिरनिया' असं कॅप्शन दिलं आहे. सूर्या दादाच्या दोन्ही बहिणींचा हा जबरदस्त डान्स पाहून नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.सध्याच्या काळात सोशल मीडियावर विविध गाणी ट्रेंड होत असतात.

# अमिषा पटेलने सांगितला हमराजचा किस्सा



या आठवड्यात द कपिल शर्मा शोचा शेवटचा भाग ऑन एअर होणार आहे. ब्रेक घेण्यापूर्वी शोच्या शेवटच्या भागात गदर 2 चित्रपटाचे स्टार्स अमिषा पटेल आणि सनी देओल दिसणार आहेत. सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनने नुकताच या शोचा प्रोमो सोशल मीडियावर अपलोड केला आहे. या व्हिडिओमध्ये सनी देओल आणि अमिषा पटेल कपिल शर्मासोबत दिसत आहेत. व्हिडिओमध्ये कपिल शर्मा गमतीने सनी देओलला विचारतो की, तो शोच्या सेटवर कारने आला आहे की ट्रकने? सनी देओल गदर 2 मधील तारा सिंगच्या पात्राच्या पोषाखामध्येच शोच्या सेटवर पोहोचला होता. यावर सनी देओल म्हणाला - मला आशा होती की अर्चना पूरण सिंह देखील माझ्यासोबत परत येईल, म्हणून मी ट्रकने आलो आहे.संभाषणादरम्यान, अमीषा पटेलने सनीचा भाऊ बॉबी देओलसोबत काम केल्यानंतर मिळालेल्या प्रतिक्रियेशी संबंधित एक किस्सा शेअर केला. अमिषाने सांगितले की, गदरनंतर तिने बॉबी देओलसोबत हमराज चित्रपटात काम केले. त्यात सनीऐवजी बॉबीसोबत शूटिंग करताना पाहून चाहते चांगलेच संतापले होते. शूटिंगदरम्यानच लोकांनी बॉबीला 'छोड इसको ये तेरे भाई की अमानत है' असे सांगितले होते, असे अमिषा म्हणाली.संवादादरम्यान कपिलने गमतीत सांगितले की, फिल्मसिटीमध्ये प्रवेश करणारी प्रत्येक गाडी तपासली जाते. पण, कोणीही सनी यांची गाडी तपासणीसाठी थांबवली नाही. रागाच्या भरात ते गेट उखडून फेकून देतील या भीतीने, लोकांनी त्यांना अडवले नाही. सनीने अनेक चित्रपटांमध्ये अशी भूमिका साकारली आहे. गदर चित्रपटातही त्याने हातपंप जमिनीतून उखडून टाकला होता. दुसरीकडे, अमिषाकडे पाहून कपिल शर्माने म्हटले की, ती महागड्या आईस्क्रीमसारखी दिसते आणि तिला पाहून तारा सिंह तिच्यासाठी पाकिस्तानला का जातो हे समजले.

# जान्हवी भावूक झाली



जान्हवी कपूर सध्या तिच्या आगामी 'बवाल' चित्रपटामुळे चर्चेत आहे. अलिकडेच तिने म्हटले होते की, आई श्रीदेवीला गमावणे ही तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती. जान्हवीला विचारण्यात आले की तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई कोणती होती? यावर तिने आईचे स्मरण करत सांगितले की, 2018 मध्ये आईचा मृत्यू ही आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती. जान्हवीच्या आगामी बवाल चित्रपटात दुसऱ्या महायुद्धाचा संदर्भ देण्यात आला आहे. चित्रपटाची टॅग लाइन 'हर प्रेम कहानी का अपना युद्ध होता है' अशी आहे. पिंकविलासोबतच्या संभाषणात जान्हवी म्हणाली- 'आई गमावली तेव्हा मी 'धडक'चे शूटिंग करत होते. मला वाटतं तिला गमावणं, या नुकसानाला तोंड देणं कठीण होतं. माझ्यासाठी पुन्हा काम करण्याचे धैर्य मिळवणे कठीण होते, या सर्व गोष्टींना सामोरे जाण्याचा मार्ग शोधणे माझ्यासाठी कठीण होते. या सगळ्यातून बाहेर पडणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती.24 फेब्रुवारी 2018 रोजी श्रीदेवी दुबईतील एका हॉटेलच्या बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळल्या होत्या. श्रीदेवी त्यांचा पुतण्या मोहीत मारवाहच्या लग्नाला कुटुंबासह दुबईला गेल्या होत्या. त्यांच्या जाण्याने जान्हवी कपूर आणि खुशी कपूर यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.जान्हवी कपूरचा 'बवाल' ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार



# आलिया भट्टचा पहिला चित्रपट माहिती आहे का?

बॉलिवूडची चुलबुली अभिनेत्री म्हणून आलिया भट्ट ओळखली जाते. आज १५ मार्च रोजी आलियाचा वाढदिवस आहे. आलिया तिचा ३१वा वाढदिवस मुलगी राहा आणि पती अभिनेता रणबीर कपूरसोबत साजरा करणार आहे. आज आलियाच्या वाढदिवसानिमित्त जाणून घेऊया तिच्याविषयी काहील खास गोष्टी...

आलियाचा जन्म १५ मार्च १९९३ रोजी मुंबईमध्ये झाला. आलियाचे वडील महेश भट्ट हे प्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक आहेत. तिची बहीण पूजा भट्ट देखील अभिनेत्री आहे. आलियाला लहानपणापासूनच बहिणीप्रमाणे अभिनेत्री व्हायचे होते. आलिया ही अभिनयाबरोबरच व्यावसाय देखील करते. तिची स्वतःची एड-ए-मम्मा (ED-E-MAMMA) नावाची कपड्यांची कंपनी आहे.

आलिया भट्टने 'स्टुडंट ऑफ द इयर' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पण हा आलियाचा पहिला चित्रपट नाही. यापूर्वी आलियाने वयाच्या ६व्या वर्षी देखील एका चित्रपटात काम केले होते. या चित्रपटाचे नाव 'संघर्ष' असे आहे. हा आलियाचा पहिला चित्रपट ठरला आहे. या चित्रपटात आलिया भट्टने प्रिती झिंटाची बालपणीची भूमिका साकारली होती. हा चित्रपट १९९९मध्ये प्रदर्शित झाल होता.

२०१२ मध्ये रिलीज झालेल्या स्टुडंट ऑफ द इयरमध्ये आलियाने प्रथमच मुख्य अभिनेत्रीची भूमिका साकारली. तिने डार्लिंग्स, हायवे, 2 स्टेट्स आणि हम्टी शर्मा की दुल्हनिया यांसारख्या चित्रपटांमध्ये काम करुन प्रेक्षकांची मने जिंकली. गंगूबाई काठियावाडीमधील आलियाच्या अभिनयाचं अनेकांनी कौतुक केले.

**आलियाची संपत्ती**

आलिया ही अभिनेत्री, बिझनेसवुमन आणि निर्माती आहे. समोर आलेल्या मीडिया रिपोर्टनुसार, आलिया ही ५५७ कोटी रुपयांच्या संपत्तीची मालकीण आहे. एका चित्रपटात काम करण्यासाठी आलिया कोट्यवधींचे मानधन घेते. तसेच ती काही ब्रँडचा ॲम्बेसिडर आहे. तिने काही जाहिरातींमध्ये काम केले आहे.

# शार्दुलसमोर मेघालयने टेकले गुडघे!

## नोंदवला रणजी ट्रॉफी इतिहासातील लाजिरवाणा विक्रम

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूरने गुरुवारी मुंबईतील शरद पवार क्रिकेट अकादमीमध्ये रणजी ट्रॉफी २०२४-२५ सामन्याच्या पहिल्या दिवशी मेघालयविरुद्ध हॅटट्रिक घेत कमाल केली. पाहुण्या संघाविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या मुंबईसाठी गोलंदाजीची सलामी देताना ठाकूरने मेघालयचा सलामीवीर निशांत चक्रवर्तीला पहिल्याच षटकात एकही धाव न देता पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर तिसऱ्याच षटकात हॅट्रिक घेत खळबळ उडवून दिली.**




प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये एखाद्या संघाच्या पहिल्या ६ विकेट्स सर्वात कमी धावसंख्येवर पडण्याच्या बाबतीत मेघालय संघ आता या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. या यादीत पहिल्या स्थानावर एमसीसी संघ आहे, ज्याने १८७२ मध्ये काउंटी हंगामात शून्य धावांवर आपले पहिले सहा विकेट्स गमावले होते, त्यानंतर या यादीत तिसऱ्या स्थानावर ऑक्सफर्ड विद्यापीठाचा संघ आहे, ज्याने १८६७ मध्ये तीन धावांवर पहिल्या ६ विकेट्स गमावल्या होत्या.रणजी ट्रॉफी २०२५ च्या सातव्या फेरीची सुरुवात उत्कृष्ट झाली. एकीकडे विराट कोहलीने दिल्लीच्या मैदानावर चाहत्यांचा महापूर आणला, तर शार्दुल ठाकूरने मुंबईत हॅट्रिक घेत खळबळ उडवून दिली.

मेघालयविरुद्ध मुंबईचा शेवटचा सामना सुरू आहे. शार्दुल ठाकूरने सामन्याच्या सुरुवातीलाच हॅट्रिक घेत मेघालय संघाला गुडघे टेकण्यास भाग पाडले. त्याच्या हॅट्रिकच्या जोरावर मेघालयने आपले ६ फलंदाज अवघ्या २ धावांत गमावले.शार्दुल ठाकुरने षटकाच्या शेवटच्या तीन चेंडूंवर बी अनिरुद्ध, सुमित कुमार आणि जसकिरत यांना शून्यावर बाद करून ठाकुरने प्रथम श्रेणीची हॅट्रिक साधली.

३३ वर्षीय ठाकुरने गेल्या सामन्यात मुंबईसाठी शानदार शतक झळकावले होते, ज्यामध्ये गतविजेत्या संघाला त्याच मैदानावर गेल्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीरकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे त्यांची बाद फेरीत जाण्याची शक्यता संपुष्टात आली होती. मात्र, शार्दुल ठाकुरने पुन्हा एकदा चमकदार कामगिरीत टीम इंडियात पुनरागमनासाठी भक्कम दावेदारी केली आहे.

शार्दुल मुंबईसाठी हॅट्रिक घेणारा पाचवा गोलंदाज ठरला. त्याच्या आधी जहांगीर बेहरामजी खोत, उमेश नारायण कुलकर्णी, अब्दुल मुसा भोय इस्माईल आणि रॉयस्टन हेरॉल्ड डायस यांनी ही कामगिरी केली आहे.अनिश चरकच्या १७ धावा आणि हिमन फुकनच्या २८ धावांच्या जोरावर मेघालय संघाला ८६ धावांपर्यंत मजल मारता आली. शार्दुल ठाकूर सध्या जबरदस्त फॉर्मात आहे. याआधी, जम्मू-काश्मीरविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात त्याने पहिल्या डावात ५७ चेंडूत ५१ धावा आणि दुसऱ्या डावात १३५ चेंडूत ११९ धावा केल्या होत्या. टीम इंडिया आता जून महिन्यात इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. जिथे भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. शार्दुल ठाकूर या मालिकेसाठी पूर्णपणे तयार दिसत आहे. टीम इंडियालाही इंग्लंडमध्ये वेगवान गोलंदाजी करणारा अष्टपैलू खेळाडू लागणार आहे.

अशा परिस्थितीत शार्दुल ठाकूर टीम इंडियाची पहिली पसंती ठरू शकतो.प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये एखाद्या संघाच्या पहिल्या ६ विकेट्स सर्वात कमी धावसंख्येवर पडण्याच्या बाबतीत मेघालय संघ आता या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे.

या यादीत पहिल्या स्थानावर एमसीसी संघ आहे, ज्याने १८७२ मध्ये काउंटी हंगामात शून्य धावांवर आपले पहिले सहा विकेट्स गमावले होते, त्यानंतर या यादीत तिसऱ्या स्थानावर ऑक्सफर्ड विद्यापीठाचा संघ आहे, ज्याने १८६७ मध्ये तीन धावांवर पहिल्या ६ विकेट्स गमावल्या होत्या.

### पुनरागमनासाठी भक्कम दावेदारी

एकीकडे विराट कोहलीने दिल्लीच्या मैदानावर चाहत्यांचा महापूर आणला, तर शार्दुल ठाकूरने मुंबईत हॅट्रिक घेत खळबळ उडवून दिली. मेघालयविरुद्ध मुंबईचा शेवटचा सामना सुरू आहे. शार्दुल ठाकूरने सामन्याच्या सुरुवातीलाच हॅट्रिक घेत मेघालय संघाला गुडघे टेकण्यास भाग पाडले. त्याच्या हॅट्रिकच्या जोरावर मेघालयने आपले ६ फलंदाज अवघ्या २ धावांत गमावले.शार्दुल ठाकुरने षटकाच्या शेवटच्या तीन चेंडूंवर बी अनिरुद्ध, सुमित कुमार आणि जसकिरत यांना शून्यावर बाद करून ठाकुरने प्रथम श्रेणीची हॅट्रिक साधली. ३३ वर्षीय ठाकुरने गेल्या सामन्यात मुंबईसाठी शानदार शतक झळकावले होते, ज्यामध्ये गतविजेत्या संघाला त्याच मैदानावर गेल्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीरकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे त्यांची बाद फेरीत जाण्याची शक्यता संपुष्टात आली होती. मात्र, शार्दुल ठाकुरने पुन्हा एकदा चमकदार कामगिरीत टीम इंडियात पुनरागमनासाठी भक्कम दावेदारी केली आहे.

# उस्मान ख्वाजाचे ऐतिहासिक द्विशतक!

## जोशचे कसोटी पदार्पणात विक्रमी शतक! मोडले अनेक विक्रम

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यातील गॅले येथे सुरू असलेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा फलंदाज जोश इंग्लिसने जबरदस्त शतक झळकावले आहे. त्याने अवघ्या ९० चेंडूत शतक झळकावले. त्याने कसोटी कारकिर्दीतील पहिल्याच सामन्यात शतक झळकावण्याचा मोठा पराक्रम केला आहे.**




ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाने गाले येथे श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी शानदार द्विशतक झळकावून इतिहास घडवला आहे. ३८ वर्षीय ख्वाजा श्रीलंकेच्या भूमीवर द्विशतक झळकावणारा पहिला कांगारू खेळाडू ठरला आहे. त्याने २९० चेंडूत आपले द्विशतक पूर्ण केले. श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज प्रभात जयसूर्याच्या चेंडूवर एक धाव घेत त्याने ही खास कामगिरी केली. तत्पूर्वी, ख्वाजाने कर्णधार स्टीव्हन स्मिथसोबत तिसऱ्या विकेट्ससाठी २६६ धावांची भागीदारी केली. ख्वाजाचे द्विशतक हे १९ वर्षांनंतर आशियात ऑस्ट्रेलियन खेळाडूचे पहिले द्विशतक आहे. यापूर्वी २००६ मध्ये नाईट वॉचमन जेसन गिलेस्पीने बांगलादेशविरुद्ध २०१ धावांची इनिंग खेळली होती. त्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला एक डाव आणि ८० धावांनी पराभव पत्करावा लागला होता.अशी कामगिरी करणारा तो २१वा ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला आहे. त्याने ९४ चेंडूंचा सामना करताना १० चौकार आणि एक षटकार मारत १०२ धावांची खेळी साकारली.

### जोश इंग्लिसचे विक्रमी शतक

९९ चेंडूत शतक झळकावले आहे.ख्वाजा आणि गिलेस्पी यांच्यापूर्वी केवळ काही ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी ही कामगिरी केली होती. यात मॅथ्यू हेडनच्या नावाचाही समावेश आहे, ज्याने चेन्नईमध्ये भारताविरुद्ध नाबाद २०१ धावा केल्या होत्या. त्याच्या आधी डीन डॉन्सने १९८६ मध्ये मद्रासमध्ये भारताविरुद्ध २१० धावा केल्या होत्या, ग्रेग चॅपलने १९८० मध्ये फैसलाबादमध्ये पाकिस्तानविरुद्ध २३५ धावा केल्या होत्या, तर मार्क टेलरने १९९८ मध्ये पेशावरमध्ये पाकिस्तानविरुद्ध नाबाद ३३४ धावा केल्या होत्या.



शिवांजली
सखी मंच
महिलांचे हक्काचे व्यासपीठ...
इंद्रायणी थडी
आमदार महेशदादा लांडगे यांच्या संकल्पनेतून
शिवांजली सखी मंच आयोजित
इंद्रायणी थडी 2025
दि. 27, 28 फेब्रुवारी व 1, 2 मार्च 2025 रोजी
सकाळी 10 ते रात्री 10
हिंदूभूषण छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, पुणे-नाशिक रोड, मोशी (पिंपरी-चिंचवड)
महाराष्ट्रातील सर्वात मोठा जत्रोत्सव, पिंपरी-चिंचवडमध्ये!



Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact : 9657767000 / 9370493922